

शाश्वत प्रवासाकडे वाटचाल

लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन
कार्यालय क्र. २०१ आणि २०२, दुसरा मजला, नवले IT झोन (फेज III), सर्वे क्र. ५१, नवले ब्रिजजवळ
नऱ्हे, पुणे – ४११०४१
ई-मेल: infolhwrf@lupin.com
वेबसाईट: www.lupinfoundation.in

प्रथम प्रकाशन: डिसेंबर २०२४
हे प्रकाशन विक्रीसाठी नाही. याचे मुखपृष्ठ बदलून किंवा इतर स्वरूपात पुनर्प्रकाशन करता येणार नाही. सर्व हक्क राखीव.

श्रेय
लेखक: प्रगती खाबिया, संप्रेषण आणि जनजागृती तज्ञ
मराठीत भाषांतर: हर्षल खाडे
संपादन: LHWRF
छायाचित्रे: श्रीकांत चौधरी, माहितीपट छायाचित्रकार
डिझाईन: कोकिला बी, स्वतंत्र चित्रकार व ग्राफिक डिझायनर

अस्वीकृती (Disclaimer)
या पुस्तकात व्यक्त केलेली सर्व मतं आणि विचार हे पूर्णपणे लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन (LHWRF) चे आहेत. ते LHWRFशी संलग्न असलेल्या कोणत्याही व्यक्ती, भागीदार किंवा संस्थेच्या अधिकृत धोरणे किंवा भूमिकेशी संबंधित असण्यास बांधील नाही.
हे प्रकाशन केवळ माहितीपर आणि वानगीदाखल प्रातिनिधिक स्वरूपात तयार करण्यात आले आहे.

तुमच्या अभिप्रायाचे स्वागत आहे!
या पुस्तिकेतील माहिती आणि त्याच्या उपयोगितेबद्दल तुमचे मत आम्हाला महत्त्वाचे वाटते.
तुमचे अभिप्राय आणि सूचना आम्हाला आणखी सुधारणा करण्यात मदत करतील.
कृपया lhwrfcommunications@lupin.com या ई-मेलवर आमच्याशी संपर्क करा

अनुक्रमणिका

06 पशुधन हीच उद्याची आशा

11 परिवर्तनाची नांदी

15 विजिगिषु वृत्तीचा अंकुर

19 पडीक जमिनीवर बागायती शेती करण्याचे स्वप्न साकार

22 शेती हेच निवृत्तिवेतन

26 सेवानिवृत्त जीवन ते सेंद्रिय शेतीचा पुरस्कर्ता होण्याचा प्रवास

30 एकतेतून घडवूया विकास

34 महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

40 नव्या संधींच्या नव्या वाटा

44 सुरक्षित शेतांपासून संपन्न भविष्याकडे

48 प्रात्यक्षिक क्षेत्राचा प्रभाव

53 प्रतिकूलतेवर मात



९५१४१

कापूस उत्पादक शेतकरी या प्रकल्पाच्या अंतर्गत येतात

५११

प्रकल्प गावे धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत

१७१००

शेतमजुरांवर सकारात्मक परिणाम झाला आहे.



कापूस उत्पादनामुळे झालेल्या परिवर्तनाच्या गोष्टी

शाश्वत प्रवासाकडे

कापूस आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे, मग तो आपण घराबाहेर परिधान केलेल्या कपड्यांत असेल किंवा अगदी घरातील आरामदायी ठिकाणीसुद्धा असेल. परंतु, पारंपरिक कापूस शेती पद्धतींमुळे पर्यावरणास हानी पोहोचते. या पद्धतींमुळे केवळ जमिनीचा पोत खराब होत नाही तर या पद्धतींमध्ये हानिकारक कीटकनाशकांचांही वापर केला जातो. याशिवाय, कापूस शेतीसाठी लागणाऱ्या आत्यंतिक जलवापरामुळे पर्यावरण आणि या स्रोतांवर अवलंबून असलेल्या समुदायांवर विपरीत परिणाम होतो. शिवाय, हवामानाच्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांच्या अभावामुळे लहान शेतकऱ्यांना या संकटाचा सर्वाधिक फटका बसतो.

या महत्त्वाच्या समस्या लक्षात घेऊन, लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन (LHWRF), बेटर कॉटन इनिशिएटिव्ह (BCI) च्या भागीदारीत महाराष्ट्रातील धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात कापूस शेतीच्या पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक बाबींवर काम करत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून, LHWRF शेतकऱ्यांना शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यास सक्रियपणे पाठिंबा देते. या पद्धती पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असून या शाश्वत लागवड पद्धतीमुळे मातीचे आरोग्य आणि जलसंवर्धन सुधारते, तसेच उत्पादन खर्च कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या उपजीविकेवरही सकारात्मक परिणाम होतो.

LHWRF ने महाराष्ट्रातील धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये बेटर कॉटन प्रकल्प राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २०१७ पासून, या उपक्रमाने ५११ गावांतील ९५,००० हून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना शाश्वत शेती अंगिकारण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. या पुस्तिकेत या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या प्रेरणादायी कथांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या शेतकऱ्यांनी, बेटर कॉटन प्रकल्पाने समजावून दाखवलेल्या पद्धती वापरून शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्यात, मातीचे आरोग्य सुधारण्यात आणि चरितार्थाच्या साधनांत वाढ करण्यात यश मिळवले आहे.



BCI (बेटर कॉटन इनिशिएटिव्ह) नी आखून दिलेली चौकट मार्गदर्शक घटक असली तरी, LHWRF ने मातीचे आरोग्य, पीक विविधता आणि सेंद्रिय खतांचा प्रचार यासारख्या क्षेत्रांमध्ये स्थानिक गरजांवर लक्ष केंद्रित केले आहे. या प्रयत्नांमुळे केवळ मातीची गुणवत्ता टिकून राहत नाही, तर शेतीची दीर्घकालीन उत्पादनक्षमता आणि पर्यावरण शाश्वततेसाठीही मदत होते. LHWRF ने शेतीतील जैविक आणि अजैविक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता अधोरेखीत केली आहे. गांडूळखताच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना जैविक कचरा पोषक खतामध्ये रूपांतरित करता येतो, ज्यामुळे प्रदूषण कमी होण्यास आणि मातीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

पर्यावरणीय फायद्यांपलीकडे, LHWRF द्वारे कार्यान्वित केला जाणाऱ्या BCI प्रकल्पाचे उद्दिष्ट सामाजिक असमानता दूर करणे आहे. हा प्रकल्प शेतकऱ्यांना कुक्कुटपालन आणि शेळीपालन यांसारख्या पर्यायी उपजीविकेच्या संधी देऊन, त्यांचे उत्पन्न विविध मार्गांनी वाढवण्यास मदत करतो. महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठीही LHWRF ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विमेन लर्निंग ग्रुप (WLG) च्या बैठकींच्या माध्यमातून महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, निर्णय प्रक्रियेत त्यांचा सक्रीय सहभाग वाढवणे आणि शेती अधिक समावेशक बनवणे यासाठी संस्था कार्यरत आहे.

LHWRF आणि BCI या दोहोंचे व्यापक ध्येय म्हणजे पुनरुत्पादक शेती पद्धतींचा प्रचार करून, पर्यायी उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देऊन आणि सर्वसमावेशक कामाच्या सुविधा निर्माण करून कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे जीवन बदलणे. हा प्रकल्प कार्यरत असताना, २०३० पर्यंत "बेटर कॉटन" उत्पादन दुप्पट करण्याच्या उद्दिष्टासह, LHWRF पर्यावरणीय शाश्वततेत मापन करण्याजोग्या सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि शेतकरी समुदायांचे सौख्य वाढवण्यासाठी कटिबद्ध आहे. BCI सोबत भागीदारीत, LHWRF कापसाच्या शेतीला केवळ पर्यावरणपूरक बनवत नाही, तर यावर अवलंबून असलेल्या लोकांसाठीही लाभदायक ठरत आहे, जेणेकरून भविष्यातील येणाऱ्या पिढ्यांना या महत्त्वाच्या कृषी संसाधनाचा लाभ मिळू शकेल. LHWRF भारतात या प्रयत्नांचे नेतृत्व करत असल्यामुळे केवळ शाश्वत शेती पद्धती विकसित करण्याचे काम होत नाही, तर कापूस उत्पादक क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवण्यासही हातभार लावला जात आहे.



पशुधन हीच उद्याची आशा

भिल कुटुंबाची नवी सुरुवात

आठवड्यातील एका धावपळीच्या मंगळवारी सकाळी आम्ही धुळे जिल्ह्यातील सडगाव गाठले. तेथील रस्ते अरुंद होते, दोन्ही बाजूंना घरं होती, आणि पारंपारिक पांढरे कपडे परिधान केलेले वयस्कर पुरुष गटागटाने बसून गप्पा मारण्यात मग्न होते. बहुतांश शेतकरी त्यांच्या शेतात निघून गेले होते, कामाच्या दिवसाची सुरुवात लवकर करण्यासाठी अधीर होते.

मुख्य रस्त्यावर आम्ही आमचे वाहन उभे करताच, आमच्या भेटीला अनेक उत्सुक आणि प्रेमळ नजरा सामोऱ्या आल्या. गावकऱ्यांना आमच्या भेटीचे कारण जाणून घ्यायची इच्छा स्पष्ट दिसत होती. LHWRF कर्मचाऱ्यांना पाहून गावकऱ्यांमधील काही ओळखीची चेहरे आनंदाने उजळले, ज्यामुळे एका क्षणातच जिव्हाळ्याचा आणि आपलेपणाचा भाव निर्माण झाला.





आम्ही गावातील अरुंद गल्ल्यांमधून आत जात असताना, एक वृद्ध दाम्पत्य आमच्या भेटीसाठी आतुरतेने वाट पाहत होते. त्या भिल कुटुंबातील सहा सदस्य एकत्र, घट्ट नात्याने बांधलेले होते. आम्ही एकमेकांकडे स्नेहपूर्ण नजरेने पाहिले आणि लवकरच लक्षात आले की ते विशिष्ट अश्या भिली बोली भाषेत बोलत होते. भाषेतील फरक असूनही, ६१ वर्षीय रायसिंग आणि त्यांची ५२ वर्षीय पत्नी आमच्याशी संवाद साधण्यासाठी खूप प्रयत्न करत होते.

आम्ही त्या दाम्पत्याशेजारी खाटेवर बसलो आणि त्यांनी उत्साहाने सांगितले की २०२३ मध्ये त्यांनी केवळ ६,००० रुपये गुंतवून त्यांना चार शेळ्या मिळाल्या होत्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, फक्त एका वर्षात त्यांचा कळप वाढला होता! त्यामुळे हुरूप आलेल्या रायसिंग यांनी स्पष्ट केले, "आम्हाला एक बोकड आणि तीन बकऱ्या देण्यात आल्या, जेणेकरून आम्ही त्यांचे संगोपन करू आणि आमचे जास्तीचे उत्पन्न कमवू."

ते पुढे सांगतात की जेव्हा त्यांना जाणीव झाली कि त्यांच्या दोन बकऱ्या गाभण राहिल्यात आणि लवकरच त्यांच्या कळपात नवीन पिल्लांची भर पडणार होती. याच एका क्षणाने त्यांच्या शेळीपालनाच्या प्रवासाची उत्तम सुरुवात झाली!



एक अल्प भूधारक शेतकरी म्हणून, केवळ शेतीवर अवलंबून राहणे कठीणच बनले होते. वर्षातील अधिकांश महिन्यांमध्ये संपूर्ण कुटुंब शेतमजूर म्हणून काम करत असे, आणि कधी कधी त्यांची मुलं कामाच्या शोधात गुजरातमध्ये स्थलांतर करत. अशा परिस्थितीत, त्यांच्या रोजच्या उदरनिर्वाहाला आधार देणारे साधन मिळणे ही काळाची गरज बनली होती.

रायसिंह पुढे म्हणाले,

“आम्हाला अनेकदा सावकारांकडून कर्ज घ्यावे लागायचे, मग ते शेतीच्या तातडीच्या कामासाठी असो किंवा कुटुंबाचा खर्च भागवण्यासाठी. अनेक वेळा, त्यांच्याकडे जाण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. काही वेळा असेही झाले की आम्ही वेळेवर कर्ज फेडू शकलो नाही, त्यामुळे इतरांकडून पैसे घेऊन ते कर्ज फेडावे लागले, ज्यामुळे आर्थिक ओझे अधिकच वाढत गेले. पण, मला कबूल करावे लागेल की गेल्या वर्षभरात आमचे कर्ज घेण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. यामुळेच आमच्या खांद्यावरील मोठे ओझे हलके झाल्यासारखे वाटते.”





रायसिंग हसले, त्यांच्या डोळ्यांत आनंदाची चमक दिसू लागली. ते पुढे म्हणाले, “आता माझा बहुतेक वेळ शेळ्या पाळण्यात जातो. मी त्यांना चरण्यासाठी अनेकदा आमच्या गावाच्या बाहेरही जातो, त्यामुळे माझा वेळ सत्कारणी लागतो आणि मला मानसिक समाधानही मिळते. मी गावातील इतर लोकांच्या शेळ्याही चरण्यासाठी घेऊन जातो आणि त्यासाठी माफक शुल्क आकारतो, ज्यामुळे आमच्या उत्पन्नात भर पडते..

याशिवाय, शेळीपालन प्रशिक्षणादरम्यान आम्ही शेळ्यांची योग्य काळजी घेण्याच्या मौल्यवान पद्धती शिकल्या." त्याच वेळी, कृषी मित्राने पुस्ती जोडली, “या प्रयत्नांना शासनाचा पाठिंबा देखील आहे. शासनानेच राजस्थानहून धुळ्यामध्ये आणलेल्या सर्व शेळ्यांसाठी औषधोपचाराची व्यवस्था केली.”

हा प्रकल्प लहान शेतकऱ्यांना पर्यायी उपजीविकेचे विकल्प उपलब्ध करून देत आहे, जसे की शेळीपालन आणि कुक्कुटपालन. या उपक्रमासाठी निवडलेले शेतकरी बहुतेक वेळा असे असतात, जे स्वतःच्या पैशानं जनावरे खरेदी करू शकत नाहीत. या उपक्रमाद्वारे त्यांना सक्षम बनविणे आणि त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे हा मुख्य उद्देश आहे.

आदिवासी समाजातील, विशेषतः भील समाजातील अनेकांसाठी, आयुष्यात पहिल्यांदा स्वतःच्या मालकीची जनावरे असणे, हा आशेचा एक किरण आहे. यामुळे त्यांना, सामाजिक-आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असलेल्या त्यांच्या पारंपरिक व्यवसायाच्या चाकोरीबंद बंधनातून मुक्त होण्याची संधी मिळते. शेळी खरेदी करणे म्हणजे सामाजिक सुरक्षिततेच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊलच आहे. शेळीपालन हे केवळ उपजीविकेचे साधन नाही तर ते एखाद्या व्यक्तीला नव्याने भविष्य घडविण्याची आणि नवीन संधी स्वीकारण्याचे बळही देते.



परिवर्तनाची नांदी

सडगावमध्ये केलेल्या पाण्याच्या ताळेबंदाचे फलित

कल्पना करा, एक सभा भरली आहे, जिथे संपूर्ण गाव एकत्र बसून त्यांच्या गावातील विद्यमान जलस्रोतांचा नकाशा (मॅपिंग अथवा रेखाकृती) तयार करत आहेत. तुम्हाला काय वाटते, अशा सभेची परिणती कशात होईल? जेव्हा समाज स्वतःच्या विकासात सक्रिय सहभाग घेतो, तेव्हा त्याच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण होते आणि समाजातील सदस्य ती जबाबदारी स्वीकारतात.

सडगावामध्येही असंच काहीसं घडतं, जेव्हा शेतकरी पाण्याच्या ताळेबंद तयार करताना बैठकीसाठी एकत्र येतात. मात्र, ही बैठक केवळ एका नकाशापुरती मर्यादित राहत नाही, तर गावकरी आपल्या जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी नव्या दृढनिश्चयानं घरी परततात.





शांताराम केशव पाटील आणि नंदुलाल साहेबराव वाघ, दोघांनीही नुकतेच चाळीशीत पदार्पण केलेले, या सभेचा एक भाग होते. त्यांनी त्यांच्या गावातील सर्वात जवळच्या जलस्रोताच्या म्हणजेच - २०१६ साली जिल्हा परिषदेद्वारे बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे मॅपिंग (नकाशे तयार) करण्यावर लक्ष केंद्रित केले. दीर्घ काळ दुर्लक्ष झाल्याने हा बंधारा खराब होऊन त्याची कार्यक्षमता कमी झाली होती. याशिवाय, बंधाऱ्याच्या सभोवतालचा भागात पुरेशी खोली व रुंदीच्या अभावामुळे पावसाचे पाणी योग्यरीत्या साठवले जात नव्हते, त्यामुळे त्यांच्या गावात पाणीटंचाईची समस्या अधिकच गंभीर झाली होती.

आम्ही सिमेंट बंधाऱ्याच्या नजीक, सडगावच्या खडकाळ जमिनीवर बसलो होतो, जिथून नजरेला येईल तिथपर्यंत हिरवीगार शेती पसरलेली होती. शांताराम आणि नंदुलाल यांनी गेल्या एका वर्षात घडलेल्या बदलांवर आपले विचार मांडले. गेल्या वर्षी अपुऱ्या पावसामुळे त्यांच्या पीक उत्पादनात घट झाली होती. मात्र, त्यांच्यासाठी आशेचा एकमेव किरण म्हणजे LHWRF ने दुरुस्त केलेल्या बंधाऱ्याच्या क्षेत्रात साठलेले पाणी, जेथे गावकऱ्यांना त्यांच्या जनावरांना पाणी पाजण्यासाठी आणता आले.

'पाण्याचा ताळेबंद' प्रक्रिया स्थानिक शेतकरी समुदायाला, त्यांच्या जलस्रोतांचे आणि शेती पद्धतींचे व्यवस्थापन स्वतः करता यावे म्हणून, सक्षम बनवण्यावर भर देते. पाण्याचा ताळेबंद या सत्रासारख्या सहभागी बैठकींद्वारे, गावकरी त्यांच्या जलस्रोतांचे चित्रण आणि मूल्यांकन करण्यामध्ये सक्रिय सहभाग घेतात, ज्यामुळे त्यांच्यात हे काम स्वतः चेच असल्याची आणि जबाबदारीची भावना निर्माण होते.

या वर्षी मात्र परिस्थिती सुधारली आहे. पावसाळ्यात भरपूर पर्जन्यवृष्टी झाली, ज्यामुळे परिसर पुन्हा हिरवा झाला आणि सिमेंट बंधाऱ्याजवळ राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी समृद्धी घेऊन आला. आता, पावसाच्या पाण्यापासून जमा झालेला सुमारे ७०० घनमीटर पाण्याचा साठा उपलब्ध आहे.



ते पुढे म्हणतात,



"माझ्या ४.९ एकर जमिनीपैकी, पहिल्यांदाच मी २ एकरावर शेवग्याची लागवड केली आहे, तर उर्वरित भागात कापूस आणि बाजरी घेतली आहे. इतक्या वर्षांनंतर मी शेती पद्धती बदलल्याचं मला अजूनही आश्चर्यच वाटतं! आमच्या पिकांच्या वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आम्हाला प्रशिक्षण दिलं जातं, ज्यामुळे आम्ही योग्य निर्णय घेऊ शकतो. ह्याच प्रशिक्षणादरम्यान मला कळलं की, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरसुद्धा, पीक पद्धतीत बदल केल्यास चांगले उत्पादन मिळवता येते. याशिवाय, शेवग्याला कमी पाण्याची गरज असल्याने पाणीटंचाईच्या काळातही ते तग धरू शकतात."

नंदुलालने देखील आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले, "कापसाच्या पिकासाठी मी सुधारित कापूस पीक पद्धती स्वीकारल्यामुळे माझं उत्पादन लक्षणीयरीत्या वाढलं आहे."

त्यांनी गाव पातळीवर काम करणाऱ्या कृषी मित्रांचे, सततच् देत असलेल्या मदतीबद्दल आभार मानले. हे कर्मचारी नियमितपणे शेतावर भेट देऊन त्यांना आणि गावातील इतर शेतकऱ्यांना सुधारित शेती पद्धती अवलंबण्यास मदत करत आहेत.

त्या सर्व शेतकऱ्यांचे अनुभव असे दर्शवतात की संपूर्ण गाव आता शाश्वत शेती आणि जलव्यवस्थापनाच्या दिशेने वाटचाल करत आहे. बदलत्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी त्यांनी एकत्र येऊन नव्या पद्धती स्वीकारल्या आहेत.

त्याशिवाय, सिमेंट बंधाऱ्याच्या पुनरुज्जीवनासोबत हवामान-अनुकूलन शेती तंत्रांच्या वापरामुळे केवळ उत्पादन वाढले नाही, तर गावाच्या उज्ज्वल भविष्याविषयीची आशाही पुन्हा पल्लवित झाली आहे.

विजिगिषु वृत्तीचा अंकुर

संगीता यांचा देऊर गावातील प्रवास


आम्ही धुळे जिल्ह्यातील देऊर गावातील शेतकऱ्यांना भेटण्यासाठी जात असताना आम्हाला शेतात काहीतरी वेचण्यात गुंतलेली, पांढऱ्या ओढणीतील एक महिला दिसली. जवळ गेल्यावर, तीच महिला आम्हाला भेटली आणि तिने स्वतःची ओळख संगीता म्हणून करून दिली.

त्यावेळी, ती तिच्या शेतात तूरडाळीच्या शेंगांची काळजीपूर्वक काढणी करत होती. तिने आम्हाला तिची टोपली दाखवली, जी तिने नुकत्याच काढलेल्या शेंगानी भरलेली होती.



आम्ही आमची ओळख करून दिली आणि हळूहळू तिच्या शेतीविषयी संवाद साधायला सुरुवात केली. तिचे पहिले वाक्य ऐकून आम्ही सर्व आश्चर्यचकित झालो. ती म्हणाली, "मी आमच्या ३ एकर शेतातील शेतीची सर्व कामं एकटीनेच करते. माझे पती अपंग असल्यामुळे ते शेतीच्या अंगमेहनीतीच्या कामात मदत करू शकत नाहीत. फक्त जेव्हा मला जास्त मदतीची गरज असते, तेव्हाच मी शेतमजुरांना कामावर ठेवते."





ती पुढे सांगते की, तिला नुकतीच ठिबक सिंचन प्रणाली मिळाली आहे, आणि तिचा विश्वास आहे की यामुळे तिच्या शेतीत मोठा सकारात्मक बदल होईल.
चेतना, कृषीकृषी मित्रांचे, मध्येच म्हणाली, "ठिबक सिंचन प्रणालीमुळे शेताला पाणी समप्रमाणात मिळेल, त्यामुळे झाडांची वाढ अधिक आरोग्यदायक होईल. या पद्धतीच्या वापरामुळे तण कमी उगवते, परिणामी तण काढण्यासाठी मजुरांची गरज भासत नाही, ज्यामुळे मजुरीचा खर्चही वाचतो. याशिवाय, ठिबक प्रणालीद्वारे योग्य प्रमाणात खतही पिकांना देता येते, त्यामुळे पिकांना योग्य वेळी आवश्यक पोषकतत्त्वे मिळतात.



आम्हाला तिच्या शेतभर पिवळसर, चौकोनी आकाराचे तुकडे अनेक ठिकाणी लावलेले दिसले. कुतूहलाने आम्ही याबद्दल विचारले, तेव्हा संगीता म्हणाली, "हे चिकट सापळे (स्टिकी ट्रॅप्स) आहेत. हे हानिकारक किडींना आकर्षित करतात आणि पिकांना त्यांची लागण होण्यापासून संरक्षण देतात. हे अगदी साधं आणि उपयुक्त साधन आहे! आम्ही याबद्दल शेतकरी प्रशिक्षण सत्रात शिकलो, आणि LHWRF टीमने हे आम्हाला उपलब्ध करून दिले."

ती पुढे म्हणाली, "माझ्या शेताच्या कडेने तुरीची लागवड केलेली आहे. जर शेजारच्या शेतावर किडींचा प्रादुर्भाव झाला, तर तो पिकावर पटकन पसरू शकतो. मात्र, तूर ही एक नैसर्गिक सापळा म्हणून काम करते आणि माझ्या कापूस व मका पिकांना किडींच्या संभाव्य हल्ल्यापासून वाचवते." संगीताला कापसासोबत डाळी आंतरपीक म्हणून घेतल्याचा निर्णय अत्यंत फायदेशीर ठरला आहे, आणि त्यामुळे तिचे उत्पादन कसे वाढले आहे हे सांगताना तिला आनंद होत होता.

प्रशिक्षणाद्वारे मिळालेलं ज्ञान खूप उपयुक्त ठरलं आहे. मला माझ्या शेतात नवनवीन तंत्र वापरून पाहायला आवडतं. प्रशिक्षणात सुचवलेल्या बहुतेक उपाययोजना या किफायतशीर आहेत, त्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार वाढत नाही. याशिवाय, ठिबक सिंचन प्रणाली खरेदीसाठी मिळालेली मदत ही माझ्यासाठी आश्वासक ठरली."



या प्रकल्पाच्या माध्यमातून ठिबक सिंचन आणि इतर शेती संबंधित उपक्रमांसाठी अनुदानित दरात मदत केली जात आहे, जेणेकरून शेतकऱ्यांवर आर्थिक बोजा येऊ नये. शेतकरी यासाठी फक्त चौथ्या हिश्श्याचा खर्च उचलतात, ज्यामुळे त्यांना मिळत असलेल्या शेतीपूरक सुविधांविषयी अधिक जबाबदारी आणि आपलेपणाची जाणीव होते.

अविनाश बोर्से, PU व्यवस्थापक, म्हणाले, "आम्ही ५ एकरपर्यंत शेती असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रित करतो आणि ठराविक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत विविध उपक्रम राबवतो. या दृष्टिकोनामुळे प्रक्रियेत पारदर्शकता टिकवली जाते आणि सर्वांसाठी समान संधी उपलब्ध होतात."

संगीताच्या आशा आकांक्षा केवळ शेतीपुरती मर्यादित नाहीत – तिचं मुख्य लक्ष तिच्या मुलाचे उज्ज्वल भविष्य घडवण्याकडे आहे, जो सध्या नाशिकमध्ये शालेय शिक्षण घेत आहे. तिची अढळ बांधिलकी आणि कठोर परिश्रम घेण्याची वृत्ती हे दर्शवते की ती त्याच्या उत्तम शिक्षणासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. तिचा साधेपणा आमच्या मनात खोलवर ठसला. पतीच्या अडचणींनाही न जुमानता, संगीता सकारात्मकतेने आणि दृढनिश्चयाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे.

पडीक जमिनीवर बागायती शेती करण्याचे स्वप्न साकार

देवरे कुटुंबाचा प्रवास

धुळे जिल्ह्यातील पिंपळखेडा गावात पोहोचल्यावर, जिल्हा परिषदेच्या शाळेच्या बाहेर रंगवलेल्या भित्तीचित्रांनी आमचं स्वागत केले. ही चित्रे बालमजुरी विरोधातील प्रभावी संदेश देत होती. आमचा प्रवास पुढे सुरू असताना, आमच्यासमोर दुतर्फा काटेरी झुडुपांनी वेढलेला अरुंद रस्ता आला, ज्यावर फक्त दुचाकी वाहनेच जाऊ शकत होती. आमच्यापैकी काहींनी पायी जाण्याचा निर्णय घेतला, तर इतरांनी गावपातळीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वापरत असलेल्या दुचाकींवरून प्रवास केला.




मुसळधार पावसाने शेताकडे जाणाऱ्या रस्त्याचे रूपांतर एका छोट्याश्या तळ्यात झाले होते. आम्हाला गुडघ्यापर्यंत पॅन्ट गुंडाळून चिखलातून वाट काढत जावं लागलं. शेवटी, चिखलाचा हा पट्टा पार केल्यानंतर, आम्ही साधारण पाच फूट उंच वाढलेल्या मका पिकाच्या रांगांमधून वाट काढत पुढे निघालो.

सुमारे १५ मिनिटे चालल्यानंतर, अखेरीस आम्ही देवरे कुटुंबाच्या शेतात पोहोचलो. तिथे आम्ही पाहिले की, एक अख्ख कुटुंब, कडक उन्हाची तमा न बाळगता तण काढण्याच्या कामात गुंतले आहे. आमची ओळख करून दिल्यानंतर, ४४ वर्षीय संजय साहेबराव देवरे यांच्याशी आमची भेट झाली. गप्पांच्या ओघात कळले की, दररोज त्यांचे आई-वडीलही त्यांच्यासोबत शेतात येतात आणि शेतीची सर्व कामे करतात.



योग्य वेळी मिळणारे प्रशिक्षण आणि कृषी अधिकारी व स्थानिक पातळीवरील कर्मचारी उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांविषयी आवश्यक ज्ञान व माहिती मिळते. यामुळे ते शेती संबंधित माहितीपूर्ण निर्णय घेऊन त्यांच्या शेतात उत्तम शेती पद्धती प्रभावीपणे राबवू शकतात.

संजय अभिमानाने सांगतात,



त्याचे वडील, साहेबराव पुढे म्हणाले, "ज्या शेत जमिनीत तुम्ही आम्हाला तण काढताना पाहिले, ती जमीन पूर्वी लागवडीयोग्य नव्हती. वर्षानुवर्षे आम्ही येथे काहीच पिकवले नाही. मात्र, गेल्या वर्षी प्रथमच आम्ही तिथे ५० पेरूची झाडे लावली आणि आंतरपीक म्हणून तूर घेतली. आम्ही खत म्हणून फक्त गांडूळ खताचाच वापर करतो. हे आमच्या क्षेत्र कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाशिवाय शक्य झाले नसते. आमचा त्यांच्यावर अपार विश्वास आहे – वेळोवेळी ते केवळ योग्य मार्गदर्शन करत नाहीत, तर खर्चिक उपायांऐवजी कमी खर्चाचे उपाय देखील सुचवतात. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, ते आता आमच्या कुटुंबाचा एक भागच बनून राहिले आहेत."

देवरे कुटुंबाचा शेतीतील परिवर्तनाचा हा प्रवास केवळ उत्पादनवाढीपुरता मर्यादित नसून, शाश्वत शेतीकडे उचललेले महत्त्वपूर्ण पाऊलच आहे. हा बदल शेतकऱ्यांना सक्षम बनवून त्यांचे जीवन समृद्ध करत आहे. नव्या आशा आणि दृढ ज्ञानाच्या जोरावर ते स्वतःच्या तसेच त्यांच्या गावाच्या उज्ज्वल भविष्याची कवाडे खुली करत आहेत.

शेती हेच निवृत्तिवेतन

शाश्वत शेतीसाठी देविदास पाटील यांचा प्रयोगशील मार्ग

सूर्य प्रखरतेने तळपत असताना एका दुपारी, आम्ही धुळे जिल्ह्यातील होळ गावात देविदास भाईदास पाटील यांच्या शेतात पोहोचलो. तेथे, आम्हाला एका भव्य पिंपळ वृक्षाने दर्शन दिले, जो देविदास पाटलांच्या आयुष्यातील अनेक आठवणींचा साक्षीदार आहे, असे त्यांनी स्वतः नंतर सांगितले. निसर्गप्रेमी असलेल्या पाटील यांनी त्यांच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त केक आणण्याऐवजी मित्रांना एक वृक्ष लावण्याची विनंती केली होती.



देविदास यांचा कामाचा दिवस सकाळी ५ वाजताच सुरु होतो, तो आपल्या लाडक्या जनावरांच्या देखभालीने. त्यांच्या गोठ्यात म्हशी, एक जोडी बैल, एक गाय आणि दोन अवखळ वासरे आहेत. ते अतिशय काळजीपूर्वक आणि संयमाने दुभत्या जनावरांचे दूध काढतात. दररोज साधारणतः १० ते १५ लिटर ताजे दूध गोळा होते. तसेच, कोंबड्या पाळल्याने त्याना दररोज १०-१५ अंडीही मिळतात, ज्यामुळे त्यांचे उत्पन्नही वाढते.





या वर्षी, देविदास यांनी त्यांच्या ४ एकर शेतात नवीन प्रयोग केला आहे, जो ते "निवृतिवेतनधारकांचे पीक" असे म्हणतात. याआधी ते प्रामुख्याने कापूस आणि मका पिकवत होते. मात्र, आता त्यांच्या शेतात सीताफळाची रसरशीत रोपे, जास्त परिचित नसलेले रामफळ आणि रसाळ आंब्याची झाडे दिसत आहेत, जी कापसाच्या पीकासोबत आंतरपीक म्हणून लावली आहेत. "ही फळझाडे एकदा चांगली वाढली की त्यांची सतत देखभाल करण्याची गरज कमी होते," देवीदास सांगतात. "माझं वय जसजसं वाढत जाईल तसतसे शारीरिक श्रम करणे कठीण होईल. या युक्तीमुळे माझे शेत उत्पादनक्षम आणि नफ्यात राहील याची मला खात्री आहे — हीच माझी नैसर्गिक निवृतिवेतन (पेन्शन) योजना आहे."



गेल्या ५-७ वर्षांपासून मी सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्यात चांगली प्रगतीही केली आहे. मी पिकांवर फवारणीसाठी निंबोळी अर्क आणि दशपर्णी अर्क यासारख्या सेंद्रिय मिश्रणांचा वापर करतो. LHWRF द्वारा आयोजित प्रशिक्षणांपैकी एका सत्रात आम्हाला हानिकारक किंवा उपद्रवी कीटक कसे ओळखायचे आणि कोणत्या प्रकारच्या खतांचा योग्य वापर करायचा हे शिकवले गेले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, मी हे शिकलो की सर्व कीटक हानिकारक नसतात; काही 'मित्र कीटक' प्रत्यक्षात पिकांसाठी फायदेशीर ठरतात. जर आपण मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते तारतम्य न ठेवता वापरली, तर हे उपयुक्त मित्र कीटकही नष्ट होऊ शकतात, ज्याचा शेवटी पिकांच्या आरोग्यावर अनिष्टच परिणाम होतो."

जेव्हा LHWRF च्या टीमने त्यांना रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करण्याचा सल्ला दिला, तेव्हा सुरुवातीला देविदास यांना कीडीचा प्रादुर्भाव होण्याची भीती वाटत होती. मात्र, सेंद्रिय खतांचा वापर केल्यावर कीटक व्यवस्थापन अतिशय प्रभावी ठरले, ज्यामुळे त्यांना मोठा दिलासा आणि आत्मविश्वास मिळाला. यामुळे अधिक उत्सुकतेने, ते सरकारी दुकानात गेले, जिथे शेतीसंबंधी आवश्यक गोष्टी विकल्या जातात. मात्र चौकशी केल्यावर कळले कि हे सेंद्रिय खत तिथे उपलब्ध नाही. तेव्हा PU व्यवस्थापक लगेचच म्हणाले, "या सेंद्रिय खतांच्या विक्रीमुळे होणारा नफा विकल्या जाणाऱ्या रासायनिक खतांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे ही दुकाने सेंद्रिय खतांचा मुळीच प्रचार करत नाहीत, आणि हीच दुर्दैवी वस्तुस्थिती आहे." देविदास शेवटी म्हणतात, "मी लवकरच माझ्या शेतात आवळ्याची झाडे लावण्याचा विचार करतो आहे. या फळाचे अनेक उपयोग आहेत आणि त्यावर प्रक्रिया करून वेगवेगळे खाद्यपदार्थही तयार करता येतात."

LHWRFच्या या उपक्रमामुळे पिकांच्या वाढीच्या विविध टप्प्यांवर वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रभावी आणि किफायतशीर उपायांची माहिती मिळते. यामुळे पर्यावरणपूरक शेतीसही चालना मिळते.

समग्र दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे देवीदास यांना आपल्या भविष्यासाठी विचारपूर्वक योजना आखणे शक्य झाले आहे. प्रगत शेती तंत्रांचा समावेश करून आणि जोडीला अतिरिक्त उत्पन्नाच्या स्रोतांची सांगड घातल्यामुळे, ते आर्थिक दृष्ट्या सक्षम राहतात, अगदी बाजारभावात चढ-उतार झाले तरीही. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याची त्यांची वृत्ती आणि त्यांनी आपले ज्ञान इतर शेतकऱ्यांसोबत वाटण्यासाठी असणारी तळमळ, ही त्यांची शाश्वत शेतीप्रती असलेली असीम निष्ठा दर्शवते.



सेवानिवृत्त जीवन ते सेंद्रिय शेतीचा पुरस्कर्ता होण्याचा प्रवास

विनायक देवरे यांची हरित क्रांती

दुपारची वेळ झाली होती; आम्ही आमच्या वाहनाबाहेर पाऊल टाकताच तीव्र उन्हाने आमचे स्वागत केले. आणखी एका शेतकऱ्याच्या शेताला भेट देण्यासाठी आम्ही निघालो होतो. आमच्यासमोर पसरलेल्या हिरव्यागार मक्याच्या शेतांच्या विहंगम दृश्याने आम्ही हरखूनच गेलो. हवेत एक तजेला होता, सुपीक मातीचा दरवळणारा सुगंध येऊ घातलेल्या भरघोस पिकाची नांदी देत होता. एका अरुंद, वळणदार रहदारीच्या रस्त्यावरून जात असताना वाटेत काही कोंबड्या पाहायला मिळाल्या, आणि प्रत्येक पावलागणिक आमची उत्सुकता अधिकच वाढत होती.



आमचे इच्छित स्थळ? ७१ वर्षीय विनायक कौतुक देवरे यांचे समृद्ध शेत, जे सेंद्रिय शेतीप्रती असलेल्या त्यांच्या निष्ठेचे प्रतिबिंब आहे. रसायनमुक्त शेती करण्याचा त्यांचा उत्साह, त्यांच्या कामाची माहिती देताना स्पष्ट दिसत होता. त्यांनी आनंदाने आमचे स्वागत केले आणि शांतपणे आम्हाला त्यांच्याकडे तयार केलेल्या सेंद्रिय खतांची सर्व भांडी दाखवली.





विनायक सांगतात, "दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी आम्ही अशा वनस्पतींची पाने वापरतो, जी गुरेढोरे खात नाहीत. कारण ती प्रामुख्याने कडू असतात. ही पाने आमच्या गावांमध्ये सहज उपलब्ध होतात आणि कीड नियंत्रणासाठी अतिशय प्रभावी ठरतात." त्यांनी त्याच्या वापराचे प्रात्यक्षिक दाखवल्यानंतर, त्यांनी स्वतः तयार केलेल्या दुसऱ्या सेंद्रिय मिश्रणाबद्दल—निंबोळी अर्क याचेही फायदे सांगितले.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी काही खते तयार करण्याचे कौशल्य स्वतः आत्मसात केले, ही बाब स्पृहणीय आहे. हे शिकण्यासाठी त्यांनी बऱ्याचदा पुस्तके, यूट्यूब व्हिडीओ आणि सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची भेट घेतली. त्यांच्या शेतासाठी तयार केलेली सुमारे ५ ते ६ वेगवेगळी खते मोठ्या भांड्यांमध्ये साठवलेली होती, जी योग्य वेळी शेतीसाठी वापरण्यात येणार होती.

विनायक यांचे डोळे चमकून उठतात आणि ते अभिमानाने सांगतात, "रासायनिक शेतीपासून पूर्णपणे सेंद्रिय शेतीकडे वळून मला आता दहा वर्षे झाली आहेत." हा बदल सोपा नव्हता, पण त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून त्यांना सेंद्रिय शेतीचे मोठे फायदे दिसले. केवळ उत्पादन वाढले नाही, तर पिके अधिक निरोगी झाली आणि हानिकारक कीटकांपासूनही संरक्षण मिळाले. "याहून महत्त्वाचे म्हणजे, ही सेंद्रिय खते तयार करण्याचा खर्च अतिशय कमी आहे," असे ते आनंदाने सांगतात.

शेतकरी जे काढून सहजपणे टाकून देतात अशा तणांबद्दल, ते विशेष बोलतात.



या प्रकल्पाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना सक्षम बनवणे हा आहे. त्यासाठी त्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे मायक्रोन्यूट्रिएंट्स तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. विनायक यांसारखे सेंद्रिय शेती स्वीकारलेले आणि त्याचे महत्व जाणून असलेले शेतकरी शोधून, हा उपक्रम - त्यांना माहिती करून घेण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करतो. हे स्थानिक मार्गदर्शक केवळ त्यांचे ज्ञान इतर शेतकऱ्यांना देतच नाहीत, तर त्यांना शाश्वत शेतीच्या पद्धती आत्मसात करण्यासही प्रेरित करतात. त्यामुळे सेंद्रिय शेतीकडे घेऊन जाणारा हा बदल अधिक सुलभ आणि करण्याजोगा ठरतो, आणि संपूर्ण समुदायाला निरोगी पिके आणि सुधारित मृदा सुपीकतेचे फायदे देखील मिळतात.



LHWRF टीमने विनायक राहत असलेल्या आणि त्यांच्या मालकीच्या इमारतीत एक दुकान भाड्याने घेतले होते. त्यामुळे विनायकचा या टीमशी नियमित संपर्क होत राहिला आणि या उपक्रमांबद्दल अधिक जाणून घेता आले. या संवादातून त्यांच्या ज्ञानात भर पडली आणि सेंद्रिय खते तयार करण्याची त्यांची इच्छा अधिकच वाढली.

आता, सरकारी शाळेतील मुख्याध्यापकांचे माजी वैयक्तिक सहाय्यक असलेले विनायक कौतुक देवरे आपल्या व्यावसायिक जीवनातून माघार घेत, त्यांच्या गावातील एक मार्गदर्शक म्हणून भूमिका सहजपणे निभावण्यात यशस्वी झाले आहेत.

दर संध्याकाळी, ते आपल्या गावातील जेष्ठ नागरिक आणि अभ्यासूवृत्ती असणाऱ्या शेतकऱ्यांसोबत एकत्र येतात, आपली मैत्री वृद्धिंगत करतात आणि शेतीविषयक ज्ञानाची देवाणघेवाण करतात. विनायक आपल्या घरी तयार केलेली सेंद्रिय खते मनमोकळेपणाने शेजाऱ्यांना देतात, जेणेकरून ते स्वतः त्याचे फायदे अनुभवू शकतील. त्यांचा उद्देश साधा पण महत्वपूर्ण आहे—शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक पद्धतींबद्दल योग्य निर्णय घेण्यासाठी सक्षम बनवणे.

एकतेतून घडवूया विकास

श्रमातून समृद्धीकडे प्रवास

धुळे जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी गाव कुर्खळी येथे तिघे मित्र—सीताराम, गंभीर आणि युवराज—यांच्याकडे सरकारने दिलेल्या एक छोटासा जमिनीचा तुकडा होता. अत्यंत गरीब परिस्थितीत आणि मर्यादित संसाधनांमध्ये वाढलेल्या या तिघांसाठी ही जमीन जीवनात स्थैर्य मिळवण्यासाठी एकमात्र संधी होती. मात्र, पाण्याच्या अभावामुळे वर्षभर शेती करणे त्यांना अशक्य कोटीतील गोष्टच वाटत होती. त्यांची शेती पूर्णपणे पावसाळ्यात मिळणाऱ्या पाण्यावर अवलंबून होती, त्यामुळे केवळ चार महिने कापसाची शेती करता येत होती. उर्वरित आठ महिने ते जिथे मिळेल तिथे मजुरी करत, कधी कधी जवळच्या गावांमध्ये जाऊन आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करत होते.





एका पावसाळी दुपारी, आम्ही त्यांची शेती पाहत असताना, डोंगरांच्या कुशीत वसलेल्या त्या जमिनीत नवीन टाकलेल्या पाईपलाईनने आमचे लक्ष वेधून घेतले. आम्ही उत्सुकतेने विचारले, "पूर्वीही तुमची जमीन अशीच सुपीक होती का?"

गंभीर सोमाजी भील यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. त्यांनी त्यांच्या प्रवासाची आठवण सांगायला सुरुवात केली. एका दीर्घ कालावधीत, त्यांनी त्यांची उंचसखल जमीन सपाट केली, आणि सामायिक बोरवेलच्या मदतीने अखेर वर्षभर पीक घेणे शक्य झाले. "पाण्याच्या उपलब्धतेवर एकत्रितपणे काम केल्याने केवळ आमच्या उपजीविकेचा विकास झाला नाही, तर संपूर्ण गावाची क्षमता वाढली," असे ते अभिमानाने सांगतात.

सन २०२०-२१ मध्ये, लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन (LHWRF) च्या कृषी मित्रांनी त्यांना सामायिक बोअरवेल उपक्रम सुचवला. त्यांनी सांगितले की, "आम्ही बोअरवेल खोदण्यात मदत करू, आणि तुम्ही तिघांनी त्याचे पाणी वाटून घ्यावे."

त्या क्षेत्राचे PU व्यवस्थापक पुढे म्हणाले, "एकट्या शेतकऱ्यासाठी बोअरवेल खोदण्याचा खर्च खूप जास्त असतो. म्हणून आम्ही काही शेतकऱ्यांना मिळून एकच बोअरवेल देण्याचा विचार केला, जेणेकरून बोअरवेलचा लाभ सर्वांना मिळू शकेल."

या गटातील शेतकरी सीताराम फुला भील यांनी सांगितले की, त्यांनी आठवड्यातील वेगवेगळे दिवस ठरवून दिले आहेत, ठरवून दिलेल्या दिवसाप्रमाणे प्रत्येक जण बोअरवेलमधून पाणी उपसतो. या उपक्रमाचा प्रभाव विचारल्यावर गंभीर भील यांनी आनंदाने सांगितले की, त्यांचे सध्याचे उत्पन्न आधीच्या तुलनेत तिप्पट झाले आहे!

ते पुढे म्हणतात,

"बोअरवेलच्या सातत्यपूर्ण पाणीपुरवठ्यामुळे आम्ही आता वर्षभर वेगवेगळे पिकं घेऊ शकतो. आधी फक्त कापसाच्या पिकावर विसंबून राहावे लागायचे, पण आता भाजीपाला आणि धान्यांची लागवड करणे शक्य झाले आहे."

"या बदलामुळे स्थानिक बाजारात चांगली किंमत मिळणारी विविध पीक घेता येतात आणि वर्षभर नियमित उत्पन्न मिळते. शिवाय, मजुरीसाठी बाहेर जावे लागण्याची चिंता उरली नाही, कारण आमच्या शेतातून आमच्या आवश्यक गरजा भागल्या जातात."



LHWRF च्या कृषी मित्रानी स्पष्ट केले की, गावांचे सखोल सर्वेक्षण करून अशा शेतकऱ्यांची निवड करण्यात आली, ज्यांच्याकडे स्वतःचा कोणताही जलस्रोत नव्हता.
या तिघांव्यतिरिक्त, या परिसरातील सुमारे ३० शेतकऱ्यांना आणखी १० बोरवेलच्या बांधकामाद्वारे मदत करण्यात आली आहे. याशिवाय, जवळून वाहणारी तापी नदी भूजल पातळी टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, ही एक शेतकऱ्यांना दिलासा देणारी गोष्ट आहे.

"ही तापी नदी म्हणजे आमच्या पिकांची जीवनरेखा आहे," गंभीर भील म्हणतात.

सीताराम, गंभीर आणि युवराज यांनी त्यांच्या जीवन प्रवासात एक नवा अध्याय लिहिला. पाण्याच्या खात्रीलायक उपलब्धतेमुळे त्यांनी आपली स्वप्ने सत्यात उतरवली आणि आपल्या कुटुंबांच्या उज्वल भविष्यासाठी एक मार्ग आखून दिला.
त्यांचा अनुभव हे सिद्ध करतो की, सहकार्य आणि सामायिक संसाधने संपूर्ण समाजाला सक्षम बनवू शकतात, आशा आणि आत्मनिर्भरतेचा नवा प्रकाश आणू शकतात.



महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

शाश्वत शेतीकडे प्रवास

धमनार हे महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील अजून एक गाव आहे. २०११ च्या जनगणनेनुसार या गावाची लोकसंख्या ४,८६१ आहे, ज्यामध्ये साधारणतः अर्धे प्रमाण (२,३२६) हे महिलांचे आहे. धमनारमध्ये पोहोचल्यावर आम्ही पाहिले की, गावातील एका घरात महिलांचे प्रशिक्षण सत्र सुरू आहे आणि अनेक महिला त्यात सहभागी झाल्या आहेत. काही महिलांनी सांगितले की, अशी सत्रं त्यांच्या समुदायाच्या बांधणीसाठी आणि आपापसात संवाद वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. त्या प्रत्येक सत्राची आतुरतेने वाट पाहतात, कारण त्यातून त्यांना नेहमीच काहीतरी नवीन शिकायला मिळते. या भूमिकांमध्ये महिलांची उपस्थिती, पारंपरिक सामाजिक संकेतांपासून फारकत घेतली जाण्याचे प्रतीक आहे, जे इतर महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि सक्षमीकरणाचा मार्ग स्वीकारण्यास प्रेरित करते.



या प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांना प्रशिक्षणाद्वारे त्यांच्या पिके आणि शेतीच्या पद्धतींबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम केले जाते. महिला शेतकरी विशेष प्रशिक्षण सत्रांमध्ये सहभागी होतात. ही सत्रं महिला कृषी अधिकाऱ्यांमार्फत घेतली जातात. या सत्रांमुळे महिलांसाठी सुरक्षित आणि सहकार्यात्मक वातावरण तयार होते, जिथे त्या विविध टप्प्यांमध्ये पिकांची काळजी कशी घ्यावी याबद्दल माहितीची देवाणघेवाण करू शकतात.

जयश्री किशोर पाटील, धमनार येथील ४६ वर्षीय शेतकरी, आपल्या परिवर्तनाचा अनुभव सांगतात:

“आम्ही पूर्वी शेतीसाठी रासायनिक खतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असायचो. पण गेल्या तीन वर्षांत माझे त्यांच्यावरचे अवलंबित्व खूपच कमी झाले आहे. सेंद्रिय खते तयार करण्याचे प्रशिक्षण मिळाल्यामुळे हे शक्य झाले. ते कसे तयार करायचे हे शिकल्यानंतर, मी ते माझ्या शेतात वापरायला सुरुवात केली. त्याचा परिणाम म्हणून उत्पादनात मोठी सुधारणा झाली आहे. एवढेच नाही, तर पूर्वी रासायनिक खतांवर खर्च होणारा पैसादेखील मी मोठ्या प्रमाणात मी वाचवू शकले.”





जयश्री यांनी पुढे सांगितले, "मी पूर्वी दोन रोपे एकत्र लावत असे, पण एका रोपाची लागवड अधिक फायदेशीर असते हे मी शिकले. या बदलामुळे माझ्या बियाण्यांचा खर्च तर कमी झालाच, शिवाय उत्पादनातही वाढ झाली." त्या आपल्या प्रशिक्षणात प्राप्त झालेल्या सल्ल्यांचे काटेकोरपणे पालन करतात आणि आपल्या पिकांचे कीड प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी चिकट सापळा (स्टिकी ट्रॅप) सारख्या तंत्रांचा वापर करतात.

या वर्षी जयश्री यांनी फलोत्पादनाच्या दिशेने एक नवी सुरुवात केली. त्यांनी एक एकर जमिनीवर ३० आंबा आणि २० पेरूची झाडे लावली. LHWRF संस्थेने त्यांना या उपक्रमात पाठबळ दिले—जमिनीची तयारी, ठिबक सिंचन प्रणाली आणि ५० फळझाडांची रोपे पुरवून मदत केली. या सुविधांचा लाभ घेण्यासाठी जयश्री यांनी देखील काही प्रमाणात आर्थिक योगदान दिले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून फलोत्पादनाची ओळख करून देण्यात आली असून, शेतकऱ्यांना विविध फळझाडांची रोपे आणि संबंधित शेती साहित्य अनुदानित दरात सुलभतेने उपलब्ध करून दिले जात आहे.

वैयक्तिक पातळीवर, जयश्री खऱ्या अर्थाने एक योद्धा आहेत. त्यांच्या आनंदी स्वभावाच्या आड मेहनत आणि कठीण परिस्थितीशी लढण्याची जिद्द दडलेली आहे. त्यांच्या मुलांचे शिक्षण अवघे पाचवी-सहावीत चालू असतानाच पतीच्या निधनानंतर, त्यांनी संपूर्ण कुटुंबाचा भार सांभाळण्यासाठी आपल्या शेतीत आमूलाग्र बदल घडवले.

या बैठकीचे संचालन करणाऱ्या महिला कृषी अधिकारी भाग्यश्री शिंदे सांगतात, "आम्ही प्रत्येकी ४० महिलांचे गट तयार करून विविध प्रशिक्षण देतो. ही प्रशिक्षण सत्रे वेगवेगळ्या टप्प्यांवर घेतली जातात —सुरुवातीचे सत्र कापूस पेरणीच्या काळात होते. त्यानंतर, शेतकऱ्यांना सेंद्रिय खत तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते तसेच योग्य प्रकारे आणि योग्य प्रमाणात खतांचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले जाते."



"त्यांना रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या पद्धती शिकवल्या जातात. त्यानंतर, पीक कापणीच्या टप्प्यात पोहोचत असताना प्रशिक्षण सत्र घेतले जाते—उदा. कापसाची तोडणी कशी करावी, त्याची योग्य प्रकारे साठवण व विक्री कशी करावी, तसेच योग्य दर कसा मिळवावा याबाबत सविस्तर माहिती दिली जाते."



त्या पुढे म्हणतात, "गावातील अनेक लोक शेतमजूर म्हणूनही काम करतात, त्यामुळे आम्ही त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देतो. विशेषतः खतांची फवारणी करताना स्वसंरक्षणाची काळजी कशी घ्यावी याबाबत जागरूकता निर्माण करतो. आम्ही त्यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे (PPE) कीट अनुदानित दरात पुरवतो, जेणेकरून शेतात काम करताना, प्रत्येकाला स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध होतील."

महिला प्रशिक्षण सत्रांमध्ये इतर महत्त्वाच्या सामाजिक मुद्द्यांवरही जागरूकता निर्माण केली जाते, जसे की बालमजुरी, मुलांचे हक्क इत्यादी. या उपक्रमांचा उद्देश महिलांना आपल्या समाजातील या आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी - शिक्षित आणि सक्षम करणे हा आहे.

भाग्यश्री सांगतात, "आमचा संदेश अधिक प्रभावी करण्यासाठी आम्ही शाळांमध्ये प्रभात फेरींचे (सामूहिकरित्या रस्त्याने प्रचार) आयोजन केलेलं आहे. या फेरींमध्ये विद्यार्थी गावातून घोषणा देत प्रयाण करतात आणि लोकांना बालमजुरीच्या घटनांची दखल घेऊन त्यावर कारवाई करण्यासाठी प्रोत्साहित करतात. शेती ही सहसा संपूर्ण कुटुंबाने केली जाणारी प्रक्रिया असते, त्यामुळे आम्ही महिलांना शेतसंबंधी निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करतो. विशेषतः, माहितीपूर्ण आणि शाश्वत शेती पद्धती स्वीकारण्यासाठी लिंगसमभावाच्या सहकार्याचे महत्त्व आम्ही अधोरेखित करतो."

माहिती आणि कौशल्य विकासाच्या प्रशिक्षणांमुळे महिलांचा प्रत्यक्ष सहभाग वाढला आहे, हा महत्त्वाचा निष्कर्ष क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी नोंदवला. महिलांनी प्रशिक्षणातून शिकलेली तंत्रे वापरून आपल्या शेतात सेंद्रिय खतांची निर्मिती सुरू केली आहे. तसेच, आपल्या कुटुंबांना या पद्धती स्वीकारण्यासाठी त्या प्रवृत्त करत आहेत. या प्रक्रियेमुळे केवळ मातीचे आरोग्य सुधारले नाही, तर उत्पादन वाढही झाली आणि महागड्या रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्वही कमी झाले. स्थानिक आणि सहज उपलब्ध ठिकाणी महिलांना कौशल्यविकास आणि शिक्षणसत्रांमध्ये सहभागी करून घेण्यामुळे निर्माण झालेल्या सकारात्मक परिणामांची ही ठळक उदाहरणे आहेत.



नव्या संधींच्या नव्या वाटा

बिजादेवी गावातील शेतीचा नवसंजीवन प्रवास

पूर्वी पारंपरिक पिकांवर अवलंबून असलेले आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे अडचणीत सापडलेल्या नंदुरबारमधील बिजादेवी गावातील शेतकरी आता नवीन संधीचे स्वागत करीत आहेत. सुधारित सिंचनपद्धती आणि जलसंधारण उपचारांमुळे, ते विविध पिके घेत आहेत आणि आपले उत्पन्न वाढवत आहेत. ज्यामुळे, त्यांची शेती वर्षभर उत्पादक राहून उत्पन्नाचे प्रमुख साधन बनले आहे.



बिजादेवीत आमच्या वाहनातून उतरताच समोरचे दृश्य अगदी शांत आणि मनमोहक होते —रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पसरलेली हिरवीगार शेती, रस्त्याखालून वाहणारे पाण्याचे ओहोळ आणि मंद सरींचा पाऊस, जो या वातावरणाला आणखी रम्य बनवत होता. शहरवासीयांसाठी हे ठिकाण एक उत्तम पिकनिक स्पॉट वाटेल, नाही का? मात्र, इथे वाहणारे पाणी आणि हिरवीगार शेतं गावकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे द्योतक होते.



BCI प्रकल्प, शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी शेतकऱ्यांना सर्वसमावेशक मदत पुरवण्याचे काम करत आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सिमेंट बंधारा (चेकडॅम) दुरुस्ती, ज्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी कार्यक्षमतेने साठवले जाऊ शकते. यामुळे केवळ जलसंवर्धन होण्यास मदत होत नाही, तर वर्षभरासाठी पाणीपुरवठा सुनिश्चित करून शेतीच्या उत्पादनक्षमतेत वाढ होते.

रस्त्यावरून पुढे चालत असताना, आम्हाला एका मिरचीच्या शेताचे अचानकच दर्शन झाले, जो आमच्यासाठी एक सुखद धक्काच होता. प्रतिभा आणि विशाल गावित हे विशीतले एक तरुण जोडपे, आपल्या पालकांसोबत २.५ एकर क्षेत्रफळाच्या या मिरचीच्या शेतात काम करत होते. शेतात ठिबक सिंचन संच बसवण्यात आले होते, आणि साधारण २० शेतमजूर ताज्या हिरव्यागार मिरच्यांची तोडणी करण्यात मग्न होते.

विशाल गावित सांगतात,

“यावर्षी पुष्कळ पाऊस झाल्यामुळे आम्हाला पीक पद्धतीत विविधता आणण्यास प्रोत्साहन मिळाले. गेल्या वर्षापर्यंत आम्ही खरीप हंगामात प्रामुख्याने कपाशीचे पीक घेत होतो. पण आम्हाला लक्षात आले की भाज्यांमुळे आम्हाला चांगले उत्पन्न मिळू शकते आणि त्याचे पीक किमान ५ ते ६ वेळा घेता येते, त्यामुळे यावर्षी आम्ही मिरची लागवडीचा प्रयोग करण्याचे ठरवले.”

प्रतिभा पुढे म्हणतात, “मात्र, संपूर्ण वर्षभर पाण्याची उपलब्धता हा आमच्यासाठी मोठा अडथळा होता. आमच्या शेतालगतच एक चेकडॅम बांधलेला असला तरी त्यामध्ये पाणी साठविले जात नव्हते. हे लक्षात आल्यावर, या चेकडॅमच्या परिसरात राहणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी हा प्रश्न LHWRF टीमसमोर मांडला, आणि त्यांनी मग त्याच्या दुरुस्ती करण्यास मदत केली.”



गावित कुटुंबासोबत संवाद साधत असताना, आजूबाजूला स्वारस्य असलेले अनेक शेतकरी गोळा झाले. त्यातील, ४२ वर्षीय शेतकरी जुगनू देसाई यांनी त्यांची गोष्ट आम्हाला सांगितली.



त्यांनी सांगितले की आता ते आपल्या ६ एकर शेतीच्या काही भागात पावसाळ्यात कपाशीसोबत सोयाबीनची शेती करत आहेत. त्यांनी स्पष्ट केले की त्यांनी पीक विविधतेची संकल्पना स्वीकारली असून सध्या पावसाळ्यात आपल्या ६ एकर जमिनीच्या एका भागावर सोयाबीन आणि कापूस लागवड करतात तसेच, त्यांनी उल्लेख केला की त्यांच्या वृद्ध वडिलांकडे आणखी ७ एकर जमीन आहे, जिथे त्यांचे सात जणांचे संपूर्ण कुटुंब पिकासाठी काबाडकष्ट करत आहेत. त्यांच्या कुटुंबाने, उन्हाळ्यात पहिल्यांदाच मूग पिकवण्याचा निर्णय घेतला.

देसाई आणि गावित या दोन्ही कुटुंबांसाठी भाज्या आणि कडधान्यांच्या लागवडीचा हा नवा उपक्रम त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे. पाण्याची साठवणूक सुधारल्यामुळे आता वर्षभर शेती करणे शक्य झाले आहे. यापूर्वी, पावसाळ्यात कापूस काढल्यानंतर रब्बी हंगाम सुरू होईपर्यंत ही जमीन वापरात येत नसे. मात्र, सुधारित जलसंधारण सुविधांमुळे या कुटुंबांना आता पीक विविधता वाढवता येणार असून वर्षभर स्थिर उत्पन्नाची अपेक्षा ठेवता येत आहे.

सुरक्षित शेतांपासून संपन्न भविष्याकडे

वळवी कुटुंबाची जिद्द आणि पुनरुत्थानाची कहाणी

सकाळी सातचा गजर होताच, राजू आणि मीना वळवी त्यांच्या शेतजमिनीकडे कूच करतात. महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्यातील डोकारे गावातून दररोज होणारा त्यांचा हा प्रवास सोपा नसतो. विशेषतः पावसाळ्यात, शेतापर्यंत पोहोचणे हे मोठे दिव्यच असते.

पक्क्या रस्त्यापासून खाली उतरल्यावर, ते एका अरुंद वाटेने प्रवास करतात, जी एका ओढ्याच्या काठाने जाते. दलदलीच्या भागांमधून मार्ग काढताना प्रत्येक पावलागणिक जमिनीत अधिकच रुतले जाण्याचा धोका असतो. त्यानंतर, ते खडकाळ भाग पार करतात, जिथे उंचसखल दगडांवरून वाहणारे पाणी त्यांच्या मार्गात अजूनच अडथळे निर्माण करते. या कठीण प्रवासाचा शेवट एका छोट्या चढाईने होतो, जिथे त्यांच्या आगळावेगळ्या शेतजमिनीपर्यंत त्यांना पोहोचता येते.

हे शेत एका जुन्या किल्ल्याच्या भिंतींमध्ये अंशतः वसलेले आहे. होय, तुम्ही बरोबर वाचले—एक किल्ला! राजू यांच्या पूर्वजांनी या जमिनीवर शेती केली होती, आणि ती पुढे वारसाहक्काने त्यांच्या कुटुंबाकडे आली.



आम्ही त्यांच्या शेतापर्यंत पोहोचताना त्यांचा हा प्रवास प्रत्यक्ष अनुभवला. दाट गवतामधून मार्ग काढण्यापासून ते पावसात निसरड्या चिखलातून वाट काढण्यापर्यंत, त्यांच्या रोजच्या संघर्षाची झलक आम्हालाही मिळाली. आम्ही फक्त एका दिवसासाठी या आव्हानांना तोंड दिले, पण राजू आणि मीना दररोज हा कठीण प्रवास करत असतात —तेही परतीच्या वाटेवर शेतमाल उचलूनच.

किल्ल्याच्या प्रांगणात, २.५ एकर जमिनीवर राजू आणि मीनाने कापूस, कारले आणि वांगी लावले आहेत. त्यांच्याकडे स्वतःचा पाण्याचा स्रोत नसल्यामुळे त्यांना संपूर्णपणे ओढ्यातील पाण्यावर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, 'ठिबक सिंचन' या कृषी साधनामुळे पिकांना आवश्यक तेवढे पाणी आणि खत पुरवणे आता त्यांच्यासाठी सुकर झाले आहे.

LHWRF शाश्वत शेती पद्धतींचा सक्रियपणे प्रचार करत आहे. तसेच, ठिबक सिंचन संच, बियाणे आणि इतर शेतीसंबंधित साधने अनुदानित दराने उपलब्ध करून देत आहे. ८०% होणारा खर्च भागवता येत असल्यामुळे राजू आणि मीना यांसारख्या ५ एकरहून कमी जमीन असलेल्या अनेक शेतकऱ्यांसाठी याचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले आहे.

राजू अभिमानाने सांगतात:

“पहिल्यांदाच वांग्याची लागवड करण्याचा प्रयोग आमच्यासाठी यशस्वी ठरला. आम्ही यावर्षी पावसाळा सुरू होण्याच्या एक महिन्यापूर्वीच वांगी लावली. अवघ्या एका महिन्यात आम्ही पहिली तोडणी करू शकलो. आता दर ८ ते १५ दिवसांनी आम्ही वारंवार पीक काढत आहोत. कृषी मित्राच्या शिफारसीनुसार आम्ही रोपवाटिकेतून वांग्याची रोपे आणली. या पद्धतीमुळे आम्ही टप्प्याटप्प्याने भाजीपाला लागवड करू शकतो, ज्यामुळे सतत उत्पादन घेणे शक्य होते. आमचे बरेच शेजारी आमच्या शेताला भेट देतात आणि त्यांची पीक पद्धत बदलण्यात रस दाखवतात.”



मीना आनंदाने म्हणतात, “माझ्या मुलींच्या शिक्षणाचा खर्च आम्ही उचलू शकतो, ही बाब मला खूप समाधान देणारी वाटते. वांग्याच्या उत्पादनात उज्ज्वल भविष्यासाठी संधी दिसत आहे आणि आम्ही त्याची लागवड करण्याचा निर्णय घेतला याचा आम्हाला आनंद आहे. त्याशिवाय, आमच्या गावातील अनेक सण-उत्सवांमध्ये वांग्याचे पदार्थ विशेष प्रिय आहेत, त्यामुळे स्थानिक बाजारासोबतच आमच्या गावातही वांग्यासाठी तयार बाजारपेठ उपलब्ध आहे!”

आर्थिकदृष्ट्या यशस्वी उत्पादन केवळ शेतकऱ्याच्या जीवनात समृद्धी आणत नाही, तर त्यांच्या कुटुंबातील स्वप्ने आणि आकांक्षा यांना उभारी देते. गेल्या वर्षी, वळवी कुटुंबाला अपयशी पीक उत्पादनाचा फटका बसला होता, ज्यामुळे त्यांच्या मुलीला नर्सिंग कॉलेजला पाठवण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. मात्र, यंदाच्या भरघोस उत्पादनाने त्यांचे नशीब पालटले आहे. आता ते मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी पाठबळ देण्यास सज्ज आहेत.

वळवी कुटुंबाचा रोजच्या संघर्षांपासून सुरु झालेला समृद्ध उत्पादनापर्यंतचा प्रवास त्यांच्या जिद्दीचे प्रतीक आहे. योग्य वेळी मिळालेल्या मार्गदर्शन आणि मदतीचे महत्त्व ते अधोरेखित करतो. त्यांच्या मुलीची स्वप्ने आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर आहेत. सुरक्षित भविष्यासाठीच्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यांचा हा प्रवास हे दर्शवतो की चिकाटी आणि योग्य सहकार्याच्या जोरावर कोणतीही कठीण परिस्थिती सुवर्णसंधीत बदलता येते.

प्रात्यक्षिक क्षेत्राचा प्रभाव

अपेक्षाच्या शेतीतील परिवर्तनाची कहाणी

धूसर डोंगररांगा आणि चिखलमय रस्त्यांच्या पार्श्वभूमीवर, अपेक्षाचे ३ एकरांचे शेत आमच्यासमोर उलगडत जात होते — मनमोहक आणि चैतन्यपूर्ण. जवळच एक मजबूत शेड उभी होती, जी तिच्या शेतीसाठी आवश्यक साधने आणि उपकरणे ठेवण्यासाठी खास तयार करण्यात आली होती—पुढील कामांसाठी पूर्णतः सुसज्ज आणि तत्पर.





अपेक्षा गणेश बच्छाव, धमनार गावातील एक समर्पित शेतकरी, जिने आपल्या 0.4 गुंठे जमिनीचा एक भाग प्रात्यक्षिक क्षेत्र (डेमो प्लॉट) म्हणून ठेवला आहे, जो त्यांच्या नाविन्यपूर्ण शेती पद्धतींप्रती असलेल्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे. या क्षेत्रामध्ये त्यांनी LHWRF टीमच्या मार्गदर्शनानुसार कापसाची लागवड काळजीपूर्वक केली आहे.

अपेक्षा यांनी आपल्या कापसाच्या रोपांचे आरोग्य सुधारण्यासाठी एक अभिनव युक्ती वापरली आहे – त्यांनी झेंडूची लागवड सापळा पीक म्हणून केली आहे. हे तजेलदार फुलझाडं नैसर्गिकरित्या किडींचे आकर्षण केंद्र बनतात, ज्यामुळे हानिकारक कीटक मुख्य पिकापासून दूर राहतात आणि जमिनीतील जैवविविधता वाढते. त्यासोबतच, त्यांनी आंतरपीक म्हणून मूग पेरले आहे, जे जमिनीत सेंद्रिय पदार्थ वाढवते आणि त्याचबरोबर उत्पादन देखील वाढवते.

अपेक्षा यांनी एका जागी केवळ एकच रोप लावण्याच्या तंत्राचे महत्व विशद केले, जे तंत्र त्यांनी प्रशिक्षणादरम्यान शिकले होते. हे तंत्र केवळ बियाण्यांचा खर्च कमी करत नाही तर पिकाच्या निरोगी वाढीसाठीही उपयुक्त ठरते. त्यांनी त्यांच्या सेंद्रिय खत वापरण्याच्या वेळेवर भर दिला आणि कापसाच्या पेरणीनंतर ४५ दिवसांनी निंबोळी अर्काची फवारणी करणे किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात दशपर्णी अर्काची फवारणी केली जाते, ज्यामुळे पीक त्याच्या वाढीच्या महत्वपूर्ण टप्प्यांमध्ये आवश्यक असणारी पोषकतत्त्वे प्राप्त करू शकते.

त्यांनी पुढे सांगितले,



आम्हाला सहा वेगवेगळ्या सेंद्रिय खतांबद्दल माहिती देण्यात आली — त्यापैकी तीन फवारणीसाठी आणि तीन ठिबक सिंचन प्रणालीद्वारे वापरण्यासाठी आहेत. LHWRF टीमने आम्हाला प्रत्येक खत कधी आणि कसे वापरावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, ज्यामुळे आम्ही आमच्या पिकांना योग्य आधार देऊ शकलो. निरंतर शिक्षण आणि संवादासाठी त्यांनी शेतकऱ्यांसाठी एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला आहे, जिथे आम्ही महत्त्वाच्या आणि अद्ययावत माहितीची एकमेकांसोबत देवाणघेवाण करू शकतो."



प्रात्यक्षिक क्षेत्रामधून (डेमो प्लॉट्स) प्रत्यक्ष शिक्षणाला चालना देण्यासाठी, समुदायाच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि शाश्वत शेती पद्धती अंगीकारण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांचे ठोस फायदे - उत्पादकता वाढवण्यासाठी, मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि शेतकऱ्यांना अधिक सक्षम बनवण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे, या प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि सुधारित कृषी पद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित करण्यासाठी प्रात्यक्षिक क्षेत्राची निर्मिती आणि वापर यांवर विशेष भर दिला जातो.

अपेक्षा अभिमानाने सांगतात, "या प्रात्यक्षिक क्षेत्रामधून शिकलेली प्रत्येक गोष्ट आम्ही संपूर्ण शेतात अमलात आणण्याचा निर्णय घेतला. आम्ही शेतीच्या पद्धती पूर्णपणे बदलल्या—आता प्रत्येक ठिकाणी केवळ एकच कापसाचे रोप लावतो आणि आंतरपीक म्हणून मूग लावतो. पूर्वी आम्ही कृषी रसायनांवर किती अवलंबून होतो हे लक्षात आल्यावर आश्चर्य वाटते—आता मात्र आम्ही सेंद्रिय खतांचा वापर करत आहोत आणि येथे शिकलेली फवारणी तंत्रे अवलंबत आहोत."

त्यांनी पुढे सांगितले की, PPE किट्स (वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे) खूप फायदेशीर ठरल्या, आणि त्यांची ओळख देखील LHWRF टीमने त्यांना करून दिली. यापूर्वी, शेतकऱ्यांना रासायनिक पदार्थांमुळे चुरचुरणे किंवा खाज येण्याचा त्रास होत असे, पण त्याला पर्याय आहे याची तेव्हा त्यांना कल्पनाच नव्हती. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे—कुटुंबातील प्रत्येक सदस्य PPE किट घालतो आणि सुरक्षितपणे काम करतो.

अपेक्षाचा उत्साह स्पष्टपणे जाणवला कारण त्यांच्या जीवनातला एका महत्त्वपूर्ण टप्पा सांगितला: "मी विमानाने प्रवास केला आहे, आणि त्याचे श्रेय BCI ला जाते!" त्यांनी सांगितले की त्यांना दिल्लीतील एका परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आले होते, जिथे त्यांनी शाश्वत शेतीविषयीचे आपले अनुभव आणि विचार मांडले. "एक महिला म्हणून, मी कधीही एवढ्या लांबवर प्रवास करेन असे वाटले नव्हते. या अनुभवामुळे माझा आत्मविश्वास दुणावला आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींसाठीची माझी बांधिलकी अधिक दृढ झाली. यामुळे आम्हालाही चांगले उत्पादन मिळत आहे."





त्यांनी पुढे सांगितले की, त्यांचा शेजारी शांतपणे त्यांच्या शेती पद्धतींचे निरीक्षण करत होता आणि आता त्याने स्वतःच्या शेतातही कापूस लागवडीचा हाच प्रयोग सुरू केला आहे. "खूप सारे शेतकरी आमच्याकडे वारंवार भेट देतात, आणि त्यांच्या प्रश्नांचे निरसनकरताना आम्हाला नेहमीच आनंद होतो. आम्हाला त्यांना आमच्या प्रात्यक्षिक क्षेत्रामध्ये, पिकाच्या आरोग्यातील प्रत्यक्ष बदल दाखवायला खूप आवडते."

प्रतिकूलते वर मात

आत्मनिर्भरतेच्या दिशेने तानाजींचा प्रवास

मर्यादित संसाधने असलेल्या सामान्य कुटुंबात वाढलेल्या तानाजीसाठी जीवन सुरुवातीपासूनच आव्हानात्मक होते. त्यांच्या आई-वडिलांची संपूर्ण शक्ती दिवसभर शेतात कष्ट करण्यातच खर्च होत होती, आणि त्यातच तानाजीच्या शारीरिक अपंगत्वाने त्यांच्या संघर्षात अधिकच भर टाकली. मात्र, तानाजीने आपल्या प्रतिकूल परिस्थितीला शरण न जाता, जिद्द कायम ठेवली आणि तो सातत्याने प्रयत्न करत राहिला. योग्य वेळी मिळालेलं मार्गदर्शन आणि पाठिंब्यामुळे तानाजी आता स्वतःचे नशीब बदलण्याच्या मार्गावर आहे.



जसे आम्ही नंदुरबार जिल्ह्यातील करंजवेल गावातील २८ वर्षीय तानाजी नाईक यांच्या शेताजवळ पोहोचलो आणि मुख्य रस्त्यालगत असलेल्या त्यांच्या जगात प्रवेश केला. तिथे आम्हाला एका साध्या शेडमध्ये नेण्यात आले, जिथे कोंबड्यांची चिवचिव आणि त्यांच्या विष्ठेचा वास पसरलेला होता. या वातावरणात तानाजी यांनी आमचे स्वागत केले, त्यांच्या डोळ्यांतून आणि हावभावांतून कृतज्ञतेचा आणि आपुलकीचा झरा वाहत होता—शब्दांची गरज उरली नव्हती. त्यांना पाहताच कळले की तानाजी जन्मतःच हातांशिवाय जन्माला आले होते. मात्र, त्यांच्या चेहऱ्यावर असलेल्या शांत आणि आत्मविश्वासपूर्ण भावनांमध्ये, त्यांच्या संघर्ष आणि जिद्दीच्या प्रवासाची चुणूक दिसली. ज्यामुळे त्यांच्या जीवन कहाणीविषयी अधिक जाणून घेण्याची उत्सुकता आमच्यात निर्माण झाली.





पोल्ट्री शेडच्या बाहेर असलेल्या खाटेवर बसून तानाजी यांनी त्यांच्या जीवनाविषयी सांगायला सुरुवात केली. कोंबड्या त्यांच्या जिवाभावाच्या सोबती झाल्या होत्या—तो दिवसभर त्यांना खाऊ घालणे आणि त्यांची निगा राखण्यात व्यस्त असतो. पदवीधर असूनही, तानाजीला त्याच्या शारीरिक अपंगत्वामुळे नोकरी मिळवण्यात अडचणी आल्या. त्याचबरोबर, हात नसल्याने तो आपल्या शेतातील कामातही - मुख्यतः कपाशीच्या पिकासाठीही, मदत करू शकत नव्हता. ही आणखी एक मोठी अडचण होती.



LHWRF आणि BCI शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पर्यायी उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विश्वास ठेवतात. यासाठी कुक्कुटपालन आणि शेळीपालन यांसारखे विविध पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जातात.

मर्यादित साधनसंपत्ती आणि परिस्थितीमुळे स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी असमर्थ असण्याची भावना किती निराशाजनक असेल, याची आम्हाला कल्पनाही करता येत नव्हती. कोणत्याही संधीशिवाय, माणसाने आपले आयुष्य कसे घडवावे? त्यांच्या डोळ्यांत उपजीविका मिळवण्याची तळमळ स्पष्ट दिसत होती. म्हणूनच, जेव्हा LHWRF ने पोल्ट्री युनिट देण्याची देऊ केले, तेव्हा त्यांना आशेचा किरण सापडला. पण अजूनही एक मोठी अडचण बाकी होती —तानाजींकडे सुरुवातीच्या गुंतवणुकीसाठी आवश्यक भांडवल नव्हते, त्यामुळे ही संधीही त्यांना अशक्यप्रायच वाटत होती.

यावेळी त्यांच्या बहिणीने मोठा आधार दिला. तिने आपले दागिने तारण ठेवून ४,००० रुपये दिले. तरीही, ५०० रुपयांची कमतरता भासत होती. यावेळी LHWRF चे कृषी मित्र मदतीला धावून आले. त्यांनी मित्रत्वाच्या नात्याने पुढाकार घेतला आणि उरलेली रक्कम सुपूर्द करून तानाजींच्या स्वप्नाला मूर्तस्वरूप दिले. आमच्याशी संवाद साधताना तानाजी आणि कृषी मित्रामधील स्नेह आणि विश्वास स्पष्टपणे जाणवत होता.

सन २०२३ च्या शरद ऋतू मध्ये, तानाजी यांना १०० सोनाली कोंबड्या, खाद्य आणि एक पिंजरा मिळाला. त्याच्या सातत्यपूर्ण निगा राखण्यामुळे ९० कोंबड्याची निरोगी वाढ झाली. पुढच्या वर्षाच्या सुरुवातीस, प्रत्येक कोंबडी साधारणतः २५०-३०० रुपयांना विकून तानाजींने चांगला नफा कमावला. भविष्यात व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी, त्यांनी काही कोंबड्या पैदाशीसाठी राखून ठेवल्या.
कमावलेल्या पैशांतून त्याने मोठे शेड बांधले आणि अधिक खाद्य खरेदी केले. तसेच, कोंबड्यांना तीन वेळा लसीकरण करण्यात आले, आणि ही मदतही LHWRF नेच पुरवली.



आम्हाला स्पष्ट जाणवले की या पोल्ट्री (कुक्कुटपालन) युनिटने तानाजीच्या आयुष्यात मोठा बदल घडवला आहे. तो पहिल्यांदाच स्वतःच्या मेहनतीने उत्पन्न कमवू शकत होता. आपल्या नव्या व्यवसायात स्वतःला गुंतवून घेतल्यामुळे, तो उज्ज्वल भविष्यासाठी आशावादी झाला आहे. नजीकच्या भविष्यात, आपला कुक्कुटपालनाचा व्यवसाय ५०० कोंबड्यांपर्यंत वाढवण्याचा तानाजींचा मानस आहे.

त्यांचा विश्वास आहे की आपला व्यवसाय वाढवल्यामुळे, समाजातील "तो वेगळा आहे आणि काहीही करू शकत नाही" या समजुती बदलल्या जातील. हीच जिद्द त्याला केवळ यशस्वी व्यावसायिक बनवण्यासाठी नव्हे, तर लोकांच्या नजरेत स्वतःबद्दलचा दृष्टिकोन बदलण्यासाठीही प्रेरित करत आहे.

लुपिन ह्युमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन (LHWRF) ही लुपिन लिमिटेडची सामाजिक जबाबदारीची शाखा असून, डॉ. देशबंधू गुप्ता यांनी १९८८ मध्ये याची स्थापना केली. गेल्या तीन दशकांहून अधिक वाटचालीमध्ये या फाउंडेशनने ८ राज्यांतील २४ जिल्ह्यांमधील ४७०० गावांमध्ये १.५७ दशलक्षांहून अधिक लाभार्थ्यांचे जीवन सकारात्मकपणे प्रभावित केले आहे.

शाश्वत उपजीविका आणि आर्थिक विकासाला चालना देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश राहिला आहे, विशेषतः देशातील सर्वात कमी विकसित जिल्ह्यांमध्ये. कुटुंब-केंद्रित दृष्टिकोन स्वीकारून, संस्थेने, लाभार्थ्यांना दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत, जेणेकरून लाभार्थ्यांच्या जीवनावर आणि उपजीविकेवर सकारात्मक परिणाम होऊ शकेल.

गेल्या दशकभरात LHWRF च्या विकासप्रयत्नांमध्ये 'उपजीविका कार्यक्रम' अत्यंत महत्त्वाचा घटक ठरला आहे. वंचित आणि असुरक्षित समुदायांसाठी शाश्वत उपाययोजना करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

- क्षमता विकास (Capacity Building)
- नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन (Natural Resource Management)
- पशुपालन विकास (Livestock Development)
- स्थानिक मूल्यसाखळी बळकटीकरण (Strengthening Grassroots Value Chains)
- शेतीमालाच्या बाजारपेठेतील प्रवेश सुधारणे (Improving Farmers' Market Access)

लाइव्ह्स कार्यक्रम (Lives Program)
या कार्यक्रमाचा उद्देश समुदायातील जीवनमान उंचावणे आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी बनवणे आहे. क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी किंवा दिर्घकालीन फुफ्फुस व श्वसनमार्गसंबंधित) आणि कार्डिओव्हॅस्क्युलर डिसीज (सीव्हीडीज किंवा हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी विकार) यासारख्या आजारांवर मात करण्यासाठी आरोग्य प्रणाली मजबूत करणे हा या उपक्रमाचा मुख्य भाग आहे.